# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## गुणपडताळणी अर्जाचा नमुना

| प्रकरणिका क्र. ________________ |
|---|
| गुणपडताळणी अर्जाचा अंतिम<br>दिनांक :- १५/०२/२०१८ |

**कार्यालयीन कामासाठी**

कोड क्र. [ ]

मा.आयुक्त

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

**विषय** :- डी.टी.एड्.व डी.एल.एड. परीक्षा नोव्हेंबर-२०१७ गुणपडताळणी अर्जाबाबत.

महोदय,

मला वरील परीक्षेत मिळालेल्या गुणांची पडताळणी करुन घ्यावयाची आहे.

१) परीक्षार्थीचे नाव / पूर्ण पत्ता --------------------------------------------------------------

२) आसन क्रमांक ---------------------------------------------------------------------------

३) अभ्यासक्रम (२००४) ------------------ ४) वर्ष (प्रथम / द्वितीय) ------------------------

५) परीक्षा केंद्र क्रमांक व केंद्राचे नांव : ------------------------------- ६) माध्यम -----------

७) गुणपडताळणी शुल्क रु १००/- प्रति विषय "**आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**" यांचे नावानेच चलनाद्धारे पाठवावे. " **बँक ऑफ इंडीया**" पुणे शाखा खाते क्रमांक **050010210000031.** **(IFSC- BKID 0000500)** या खात्यावर रक्कम भरावी व चलन/पावतीची प्रत अर्जासोबत जोडावी.

रक्कम ______________________ चलन क्रमांक ________________________________ तारीख ________________________

८) प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासाठी फक्त एकच अर्ज गुणपडताळणीसाठी करावा व सोबत गुणपत्राची छायाप्रत जोडावी.

९) गुणपडताळणी करावयाचे विषय : १०) गुणपडताळणी विषयांची संख्या

| अ.क्र | विषय संकेतांक क्रमांक | विषयाचे नाव | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

> **टीप :** गुणपडताळणीच्या निर्णयाची वाट न पाहता आगामी परीक्षेसाठी आवेदनपत्र मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

आपला विश्वासू,

**विद्यार्थ्यांची सही**

वरील तपशील अभिलेखावरुन तपासून पाहिला असून तो बिनचूक असल्याची खात्री केली आहे.

**टीपः-** १) प्रथम भाषा / द्वितीय भाषा / तृतीय भाषेसाठी गुणपडताळणी अर्ज करावयाच्या असल्यास विषय कोड क्रमांक बिनचूक लिहिणे आवश्यक आहे.

२) बैठक क्रमांक, विषयाचे नांव व विषय कोड क्रमांक बिनचूक लिहिले बाबतची खात्री केली आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज रद्द होईल याची दक्षता घेतली आहे.

३) अंतिम दिनांकापर्यंतच अर्ज प्राप्त होणे आवश्यक आहे. अर्ज पोस्टाने पाठविला असल्यास संबंधित टपाल मुदतीच्या आत प्राप्त होणे जरुरीचे आहे. मुदतबाहय अर्ज उशिरा प्राप्त झाल्याने स्विकारला जाणार नाही.

४) अंतर्गत गुणाच्या पडताळणीसाठी परीक्षा परिषदेकडे अर्ज करु नयेत. परिषदेस सादर केलेल्या डी.टी.एड्.५० च्या स्थळप्रती / झेरॉक्स प्रतीवरुन खात्री करुन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

५) गुणपडताळणी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक १५/०२/२०१८ आहे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व कोणत्याही परिस्थितीत भरलेले शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**प्राचार्य,**

**अध्या.विद्या. चा कोड क्रमांक** **अध्यापक विद्यालय, स्वाक्षरी व शिक्का**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणेबाबत अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| प्रकरणिका क्र. | |

डी. टी. एड्. परीक्षा नोव्हेंबर २०१७

प्रति, अर्ज करण्याचा अंतिम दि. १५/०२/२०१८

मा. आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

महोदय,

मी खाली सही करणार विनंती अर्ज करते की /करतो की, नोव्हेंबर २०१७ अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (D.T.Ed) /प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D.El.Ed.) परीक्षेसाठी खाली नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झाले होते /झालो होतो. सदर परीक्षेच्या खालील विषयांच्या उत्तरपत्रिका /उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मला मिळावी /मिळाव्यात यासाठी मी रु. ४००/- (रुपये चारशे मात्र) प्रति विषयशुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशिल खालीलप्रमाणे.

| परीक्षा बैठक क्रमांक | परिक्षार्थीचे पूर्ण नाव | अ. वि. संकेतांक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| | | |
|---|---|---|
| पिनकोडसह पूर्ण पत्ता :- | | |
| | | |
| तालुका :- | जिल्हा :- | पिनकोड नंबर |
| दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्र. | | |

**उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणेबाबतचा तपशील :**

(संकेतस्थळावरील गुणपत्रिकेची / प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत (झेरॉक्स) सोबत जोडावी. )

| अ.क्र. | विषय कोड क्रमांक | विषयाचे नाव | माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| उ.प. छायांकित प्रत देणेसाठी अर्ज केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी. डी. क्रमांक | पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | | |

सदर उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मिळण्यासाठी प्रती विषय शुल्क ४००/- रुपये प्रमाणे **"आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे"** यांचे नावानेच चलनाद्धारे पाठवावे. किंवा **" बँक ऑफ इंडिया" पुणे शाखा खाते क्र. <u>050010210000031</u> <u>(IFSC- BKID 0000500)</u>** या खात्यावर रक्कम भरावी व पावती/ चलनाची प्रत अर्जासोबत जोडावी.

वरील दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या सोबत दिलेल्या अटी / शर्ती व सूचना त्या मला मान्य आहेत. वरील विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती हस्तपोच / पोस्टाव्दारे देण्यात याव्यात. वर दिलेली माहिती सत्य आहे.

दिनांक : ठिकाण : विद्यार्थ्याची स्वाक्षरी

उत्तरपत्रिका छायाप्रतीची मागणी करण्याच्या अर्जाची अंतिम मुदत दि.१५/०२/२०१८ अशी आहे. या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. ज्या विषयासाठी छायाप्रत मागणी केली आहे, त्याच विषयाच्या गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नाही.

**टिप :- वरील तपशील तपासून पाहिला असून तो बिनचूक असल्याची खात्री केली आहे.**

प्राचार्य,

स्वाक्षरी व अध्या. विद्या. शिक्का

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

## उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी /शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहीत पध्दतीने अध्यापक विद्यालयामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) ऑन लाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत विद्यार्थ्यांमार्फत परिषदेकडे विहीत नमून्यात अर्ज करावेत तद्नंतरच्या दिनांकांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३) विहीत अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी **प्रतिविषय रु.४००/-** इतके शुल्क आकारण्यात येईल.

५) उत्तरपत्रिका छायाप्रती मागणी बाबतचा अर्ज व शुल्क (रोख किंवा परिषदेच्या चलनाव्दारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाव्दारे) थेट परिषदेकडे अथवा पोस्टाने स्विकारण्यात येईल. अर्जासोबत विद्यार्थ्याच्या संकेतस्थळावरील गुणांची गुणपत्रिकेची छायाप्रत जोडावी.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) अर्जदारास छायाप्रत मिळण्याचा संभाव्य कालावधी त्याला भ्रमणध्वनी व्दारे कळविण्यात येईल.

८) उत्तरपत्रिकेची छायाप्रतीची मागणी पोस्टाव्दारे असल्यास पोस्टाचा पूर्ण पत्ता जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने किंवा हस्तपोच देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र / फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११) मा. सर्वोच्च न्यायालयाने परितोष भूपेशकुमार शेठ AIR १९८४/SC१५४३ च्या प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशानुसार तसेच तरतूदीनुसार विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन किंवा उत्तरांची पुन्हा तपासणी करण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यास तसा हक्क असणार नाही.

१२) एकदा उत्तरपत्रिकेची छायाप्रत दिल्यावर त्याच्याशी संबधित कोणतीही माहिती, माहिती अधिकाराखाली दिली जाणार नाही.

१३) परीक्षक /नियामक इ. ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१४) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१५) उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१६) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१७) विहीत मुदतीत उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी करण्याचा विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त न झाल्यास कोणत्याही परिस्थितीत आपण अदा केलेले शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप :- संबधीत सूचना प्रसिध्दीसाठी अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नजरेस येईल अशा दर्शनी नोटीस बोर्डवर लाववी.**